|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**बातमी क्र. १**

जळगाव दि. ११ (        ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राष्ट्रीय सेवायोजना एककाच्या हिवाळी शिबीराला प्रारंभ झाला असून या शिबीराचे उद्‌घाटन दि. १० जानेवारी रोजी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गणित प्रशाळेचे संचालक प्रा.आर.एल.शिंदे, टाकरखेडे गावाच्या महिला सरपंच सौ.साधनाताई पाटील व या शिबीराचे विशेष उद्‌घाटक कु.तुळसाबाई गायकवाड इयत्ता चौथीची जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा.माहुलीकर यांनी विद्यार्थ्यांनी सामाजिक भावना जोपासावी व उपक्रम आखावेत असे आवाहन केले. या शिबीराच्या आयोजनासाठी समन्वयक प्रा.एस.एम.पाटील, डॉ.मधुलिका सोनवणे, प्रा.मनोज पाटील व प्रभाकर पाटील कार्यरत आहेत.

---

**बातमी क्र. २**

जळगाव. ११ (      ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेच्या वतीने १३ व १४ जानेवारी रोजी `अलजेब्रा, ॲनलिसिस् ॲण्ड नंबर थेअरी` या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

दोन दिवसाच्या राष्ट्रीय परिषदेत आर.बालसुब्रमणियन, एम.वन्नीनाथन्, जे.के.वर्मा (आय.आय.टी.,मुंबई), यु.के.आनंदवर्धन, के.सुरेशकुमार, इंद्रनाथ सेनगुप्ता, पी.विरमणी, एच.अनंतनारायण, सौरव पॉल, संतनू डे, दीगंत्ता बोरा, महेश धुमलदार, अनिशा चौरवडाला, दिलीप पाटील, रवी रघुनाथन्, के.जे.इंगळे, डी.आर.बोंडे, संदीप जोशी, एस.पी.वाणी, चारु गोयल, सी.टी.आगे, के.डी.कुच्चे, डी.बी.पाचपट्टे, अर्घया मोंडल, पी.श्रीवास्तव, अरिंदम जना, बी.एस.देसले, एन.आर.दासरे, एस.जी.दाबके, व्ही.एल.चिंचाने, एम.एम.पवार, के.प्रसाद आदी सहभागी होणार आहेत अशी माहिती प्रशाळेचे संचालक प्रा.आर.एल.शिंदे व परिषदेचे निमंत्रक प्रा.एस.आर.चौधरी यांनी दिली.

---

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : ११ जानेवारी, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी